# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ    16 Languages    Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIV    YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, APRIL 2022    No. 03


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

**१ योहान ४:७-१४**

७. प्रियजनहो, आपण एकमेकांवर प्रीति करुं, कारण प्रीति देवापासून आहे; जो कोणी प्रीति करितो तो देवापासून आहे; व देवाला ओळखतो.

८. जो प्रीति करीत नाहि तो देवाला ओळखीत नाही; कारण देव प्रेमस्वरुप आहे.

९. देवानें आपल्या एकुलत्या एक पुत्राला जगांत पाठविले आहे, यासाठी की आपण त्याच्या द्वारे जीवंत राहावें, यामध्ये देवाची प्रीति आपल्या ठायी प्रकट झाली.

१०. प्रीति म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीति केली असे नाही; तर त्याने तुम्हांआम्हावर प्रीति केली आणि स्वपुत्राला आपल्या पातकांचे प्रायश्चित व्हावे म्हणून पाठविले.

११. प्रियजनहो; जर देवानें आपल्यावर अशा प्रकारे प्रीति केली. तर आपणहि एकमेकांवर प्रीति केली पाहिजे.

१२. देवाला कोणी कधीहि पाहिले नाही; आपण एकमेकांवर प्रीति करितो तर देव आपल्या ठायी राहतो, आणि त्याची प्रीति आपल्या ठायी पूर्ण होते.

१३, आपण त्यामध्ये व तो आपल्यामध्ये राहतो, हे आपण यावरुन ओळखतो की त्याने स्वत:च्या आत्म्यांतून आपल्याला दिले आहे.

१४. आम्ही पाहिले आहे व साक्ष देतो की पित्यानें पुत्राला जगाचा तारणारा असे पाठविले आहे.

# येशूचा वध:स्तंभ!

# THE CROSS OF JESUS!

बंधु एम्. पॉलराज

**''ज्यांचा नाश होत आहे, त्यांस वध:स्तंभा - विषयीचें शिक्षण मूर्खपण आहे; तरी ज्यांस तारण प्राप्त होत आहे अशा आपणांस ते देवाचे सामर्थ्य आहे.'' (१ करिंथ १:१८)**

एके काळी वध:स्तंभ! शापाचे चिन्ह समजले जात होते. परंतु येशू ख्रिस्ताच्या क्रुसावर खिळीले गेल्यामुळे ते शापचे चिन्ह राहिले नाही, तर तारणाचे आणि प्रीतिचे चिन्ह झाले आहे. आजकाल, लाखो स्त्री-पुरुष क्रुस प्रेमाचे आणि आशीर्वादाचे चिन्ह म्हणून गळ्यात घालतात. बायबल म्हणते, ''**...जो कोणी झाडावर टांगलेला आहे तो शापित आहे.**'' (गलती ३:१३) परंतु येशू ख्रिस्ताने ते तारणाचे आणि प्रीतिचे चिन्ह केले! येशू ख्रिस्तानें काही क्रुसावर मरण्याची निवड केली नव्हती; परंतु युहूदी आणि रोमी यांनी त्याला गुन्हेगार ठरवून त्याजवर लादली.

## जग त्याकडे कसे पाहते?

येशूच्या वध:स्तंभावरील मृत्युकडे कसे पाहते? २० व्या शतकातील एक ब्रिटीश कवि आणि तत्वज्ञानी, टी.एस्. एलीओट असे म्हणाले, ''वध:स्तंभ हे सर्वश्रेष्ठ त्यागाचे चिन्ह आहे. हे संपूर्ण जगाकरिता चिन्ह आहे. वध:स्तंभ हे मृत्युपत्राद्वारे जगाला सर्व काळासाठी दिलेले दान आहे.'' भारताचे महान तत्वज्ञानी डॉ. एस्. राधाकृष्णन हे म्हणाले, ''वध:स्तंभ हे दु:ख आणि व्यथा सहनाचे चिन्ह आहे;'' १५ व्या शतकातील कवि आणि तत्वज्ञानी अे. केंपीस यांनी त्यांच्या इमिटेशन ऑफ खाइस्ट या पुस्तकात म्हटले, ''वध:स्तंभ हे तारण, जीवन, वैऱ्यांपासून संरक्षण आहे, वध:स्तंभ स्वर्गाचे चांगुलपण देतो, वध:स्तंभ चांगूलपणाचा कळस आहे आणि तो पवित्रतेची परिपूर्णता आहे.'' पौला नुसार ''तो तारणपावणाऱ्यांकरिता देवाचे सामर्थ्य असा आहे.''

जगातील अनेक लोक क्रुसावरील संदेशाकडे मूर्खपणा म्हणून पाहातात. परंतु ज्यास तारण प्राप्त होत आहे त्या आपणास देवाचे सामर्थ्य असा आहे. क्रुसाच्या मनन-चिंतना द्वारे स्फूर्ती मिळते.


## वध:स्तंभची भयंकरता!

येशूला आपल्याला क्रुसावर मरावे लागेल हे ठाऊक होते, कारण अपराध्यांना/गुन्हेगाराला जास्तीत जास्त शिक्षा तीच शिक्षा देण्यात येत असे. कठीण अंत:करणाचे यहूदी आणि रोमी लोक येशूला गुन्हेगारच मानत होते. यहूदीयांना तो त्यांच्या कायद्याचा विरोधक आणि त्यांच्या काळातील जुन्या परंपरांसाठी धोका वाटत होता. रोमनांना यहूदियाचे सतत चालत आलेले वर्चस्व शांत करावयाचे होते. यहूदियांना येशूच्या वध:स्तंभावर जाण्या अगोदर त्याची कल्पना होती. कारण त्याने तसे त्याच्या शिष्यांना सांगितले होते. परंतु शिष्यांनी त्याकडे

(ऊरवरीत पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

(ECHO GROUP)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

"... तुं विश्वास करशील तर देवाचें गौरव पाहशील..." (योहान ११:४०)



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


CHIEF EDITOR

Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

MANAGING EDITOR

Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION

Bro. N. Prakasam, M.A., General Manager

EDITORIAL BOARD

Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.



EDITOR, PUBLISHER & PRINTER

Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.

Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

E.mail ID

sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES

www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL

Echo of His Call


प्रभुमधील अती प्रियांनो,

आम्ही आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या, येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा देत आहोत.

तुम्ही सर्वांच्या सतत करीत असलेल्या प्रार्थना आणि देव असलेला आधार यामुळेच आमची सर्व सेवा कार्ये, विशेषकरुन आमची प्रार्थना सेवा, १६ भाषेत प्रसिद्ध करण्यात येत असलेले मासिक, मंडळीतील सेवा, बायबल कॉलेज, ऑनलाईन हिन्दी बायबल कॉलेज, पत्रव्यवहाराद्वारे, करण्यात येत असलेले अभ्यास क्रम, शुभवर्तमान मुद्रणालय, लेकरांमधील सेवा, रुग्णालय सेवा आणि गावातील हायस्कूल व्यवस्थित कार्यरत आहे. आम्ही देवाच्या सर्व दयेबद्दल त्याची स्तुति करीत आहोत.

हल्लीच्या समयात, आम्हांला आमच्या सुर्वाता कार्यात आणि सुवार्तिकांना अनेक प्रकारे आणि अनेक मार्गांनी विरोध आणि अडखळणे अनुभवण्यात येत आहेत. आमच्या पहाण्यात असे आले आहे , कि, हे विरोध करणारे आणि अडखळणे आणणारे लोक आहेत, त्यांना मंडळ्यां द्वारे पुष्कळ मदत करण्यात आलेली आहे. आणि त्यांच्या तारुण्याच्या दिवसात त्यांचे शिक्षण ख्रिस्ती शाळांमध्ये झालेले आहे. आणि ज्या शाळेमध्ये आणि कॉलेजांमध्ये त्यांनी ज्ञानार्जन केले त्यांची नावे घेण्यात त्यांना अभिमान वाटतो. परंतु आता मात्र ते मदत करणाऱ्या ख्रिस्ती संस्थाचा आणि मंडळ्यांचा द्वेष करीत आहेत.

या त्यांच्या द्वेष करण्यामागचे काय कारण आहे? या संबंधी खोलवर जाऊन विचार केला तर आपल्याला कळते कि, यासाठी काहि प्रमाणात आपणावर दोष लागतो. देवाचे सेवक या नात्याने आणि शिक्षण संस्थांच्या तज्ञांनी त्या काळात त्यांना प्रामाणिक राहाण्याचे आणि स्वत: देखील कृतिद्वारे ते दर्शविले नाही.

मला हे उदाहरणासहित स्पष्ट करु द्या. मी ज्या सरकारी हायस्कूल मध्ये शिकलो, त्या शाळेत मिस्टर थॉमस नावाचे, कॅथॉलीक चर्चचे सभासद असलेले शिक्षक होते, आणि दुसरे एक मिस्टर जॉनसन नांवाचे दुसऱ्या एका चर्चचे सभासद असलेले शिक्षक होते. त्या उभयतांनी त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीत, आवडीत आणि कलेत उच्च प्रकारचा दर्जा प्रस्थापित केलेला होता. त्यांनी त्यांच्या कृतित, पोषाखात आणि स्वभावात उत्तम उदाहरण होते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचे गुणांचे ग्रहण करुन त्या शैक्षणिक संस्थेमधुन उत्तम स्वभाव गुण आणि देवा विषयी खरे भय असलेली व्यक्ति म्हणून बाहेर पडले. मी देखील त्यांच्यापैकी एक आहे.

दुसऱ्या बाजुला पाहिले, तर आपल्याला असे अनेक लोक आढळतील, ज्यांनी ख्रिस्ती शाळेत आणि महाविद्यालयात शिक्षण घेतले आणि असे कांहि आहेत जे ख्रिस्ती मंडळीमध्ये केवळ कांही मदत मिळावी यासाठी उपस्थित राहू लागले. अनेकांना ख्रिस्ती दवाखान्यांत औषधोपचार मिळाल्यामुळे जीवदान मिळाले, ते आता देवाच्या वचनाचा द्वेष करितात आणि देवाच्या सेवकांना विरोध करितात! आणि ह्याला कारण ख्रिस्तजन, ख्रिस्ती सेवक आणि ख्रिस्ती शिक्षणतज्ञ. बहुतेक दोष हा आपल्याकडेच येतो. त्यांच्या मध्ये ख्रिस्त बिबविण्यात किंवा रुजविण्यात अपयशी ठरलो.

भविष्यात, आपण जे ख्रिस्तीजन आहोत. त्या आपणाला आपल्या जीवनात देवाचे खरे पाचारण कळले पाहिजे, आमच्या प्रार्थनेच्या जीवनाचे उत्तम उदाहरण ठेवले पाहिजे, शहाणपणाने वागले पाहिजे, दयाळूपणाचे कार्यक्रम केले पाहिजे, अशामुळे आपले पाहून ते देखील आपले

अनुकरण करुन देवाचे भय बाळगतील. आपल्या देवाच्या सेवकांनी आणि शाळा-कॉलेजातील शिक्षकांनी आपल्या जीवनाद्वारे प्रभु येशू ख्रिस्ताचे जीवन परावर्तित करण्यासाठी पुढे आले पाहिजे तेव्हाच आपण लोकांची खऱ्या अर्थाने बंधनातून सुटका होण्याची अपेक्षा करू शकतो.

देव तुम्हाला आर्शीवाद देवा. परवर्तित करण्यासाठी पुढे आले पाहिजे. तेव्हांच आपण लोकांची खऱ्या अर्थाने बंधनातून सुटका होण्याची अपेक्षा करु शकतो.

"**तुम्हांस सत्य समजेल, व सत्य तुम्हांस स्वतंत्र करील.**" (योहान ८:३२)

'**एको ऑफ हिज कॉल**' परिवाराने हे त्यांच्या हृदयात ग्रहण करुन त्यांच्या प्रार्थनांत याची आठवण करो!

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**
**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858
E-mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

गांभिऱ्याने लक्ष दिले नाहि. कारण त्याच्या गुरु-स्वामीवरील प्रेमाने त्यांचे डोळे व मन आंधळे झालेले होते.

मृत्युदंडाची शिक्षा फर्माविलेल्या इसमाची स्थिती जनावरापेक्षाहि वाईट असे. कोणीहि त्याच्या विषयी काळजी करीत नसत. गुन्हेगाराला वध:स्तंभावर खिळण्या अगोदर, अतिशय निर्दयपणे त्याच्या शरिरावर चाबकाचे फटके मारण्यात येत असे. त्या चाबकाच्या टोकाला खिळे किंवा हाडांचे तुकडे लाविलेले असत. अपराध्याला एका वेळेस ३९ फटके मारण्यात येत असत आणि कधी-कधी पुन: दुसऱ्यांदा देखील तसे फटके मारण्यात येत असत. त्यामुळे तो अपराधी अर्धमेला होत असे. येशूला देखील त्याने काही अपराध केलेला नसतानाहि तीच शिक्षा देण्यात आली होती. रोमी पिलाताने जाहिर केले होते, "मला याच्या ठायी कांही अपराध आढळत नाही" तरी देखील कठीण हृदयाच्या यहूदीयांनी आणि शास्त्री-पुरुशांनी त्याच्या मृत्युची मागणी केली आणि त्याजवर ती लादली गेली. त्यांनी निर्दोष रक्त वाहविले. स्तोत्र कर्त्याने अनेक वर्षे अगोदर त्याविषयी भविष्यवाणी केली होती, "**नांगऱ्यांनी माझी पाठ नांगरिली; त्यांनी अपल्या नांगरांनी लांबलांब तासे काढिली.**" (स्तोत्र १२९:३)

## येशू वध:संभावर खिळला गेला होता

नेहमी प्रमाणे वध:स्तंभावर अपराध्याला खिळण्याची जागा शहराच्या/गावाच्या बाहेर असे. अपराध्याला त्याचा लाकडी क्रुसखांब रस्त्यावरून खांद्यावर वाहत-वाहत खिळण्याच्या जागेपर्यंत जावे लागत असे. अपराध्याने त्याच्या अपराधाची दिलेली कबुली एका पाटिवर लिहून, इतरांना ती कळावी यासाठी त्याच्या गळ्यात लटकविली जात असे. सैनिक अतिशय निर्दयीपणे अपराध्याचे सर्व कपडे काढून घेत असत व गुह्यांगावर एक छोटेसे कापड झांकीत असत. त्यांना दिवसाचे कडक उन आणि रात्रीची थंडी सहन करावी लागत असे. त्यांची पाठ नांगरलेल्या शेताप्रमाणे झालेली असे.

खिळण्याच्या जागी पोहचल्यावर अपराध्याला त्याने खांद्यावर वाहून आणलेल्या लाकडी क्रुसखांबावर दोन्ही बाजूला हात लांब करुन व पाय एकावर एक ठेवून झोपण्यास सांगितले जाते. त्यानंतर त्याचे हात आणि पाय बांधण्यात येत असत किंवा खिळे ठोकण्यात येत असत. येशूच्या हातात आणि पायात खिळे ठोकण्यात आले होते. येशूला शुक्रवारच्या दिवशी क्रुसावर खिळण्यात आले होते. क्रुसखांब दोरखंडाच्या आधाराने खड्यांत टाकून उभा केला जात असे. क्रुसाला खिळलेला/बांधिलेला अपराधी हा स्वर्ग आणि धरती या दोहोंच्या मध्ये लटकलेल्या स्थितीत असे. शनिवार हा यहूदीयांचा शब्बाथ दिवस असल्यामुळे त्या दिवशी ते शरीर क्रुसावर राहू देत नसत. अपराध्याचा शुक्रवारच्या दिवशीच मृत्यु झाला तर त्याचे हात किंवा पाय तोडले जात नसत; परंतु तो जीवंत असेल तर सैनिक त्याला अधीक तीव्र वेदना देऊन त्याचा मृत्यु लवकर व्हावा यासाठी त्याचे हात किंवा पाय मोडीत असत. कांही अनेक दिवस त्या खिळलेल्या/बांधलेल्या अवस्थेत जीवंत राहत असत आणि वेदना असह्य होत असल्यामुळे वेड्या सारखे ओरडत असत.

येशूने त्याला वध:स्तंभावर खीळल्यानंतर शुक्रवारच्याच दिवशी सहाव्या तासाला प्राण सोडला. त्याला भारतिय वेळेनुसार सकाळी ९ वाजता क्रुसावर खिळण्यात आले. दुपारच्या १२ वाजता त्याने पापाचा शापाचा, व्याधींचा प्याला प्याला. आणि दुपारी ३ वाजता प्राण सोडला. त्यामुळे त्याची हाडे मोडण्यात आली नाहीत. एका सैनिकाने तो मृत्यु पावल्याची खात्री करुन घेण्यासाठी त्याच्या कुशीत भाला भोसकला आणि कुशीतून रक्त व पाणी बाहेर आलेले पाहून त्याची खात्री झाली.

येशू ख्रिस्ताने वध:स्तंभावरुन येणे प्रमाणे सात शबद उच्चारीले :-

१) "हे बापा ह्यांना क्षमा कर, कारण हे काय करितात हे ह्यांस समजत नाही" (लूक २३:३४)

२)"मी तुला खचीत सांगतो, तू आज मजबरोबर सुखलोकांत असशील." (लूक २३:४३)

३) येशूने आईला म्हटले, बाई पाहा, हा तुझा पुत्र!" मग त्याने शिष्याला म्हटलें, पाहा, ही तुझी आई!" (योहान १९:२६-२७)

४) "एलोई, एलोई, लमा सबक्तनी, म्हणजे 'माझ्या देवा, माझ्या देवा, तूं माझा कां त्याग केलास?" (मत्तय २७:४६)

५) यानंतर सर्व पूर्ण झाले आहे जाणून येशूनें शास्त्रलेख पूर्ण व्हावा म्हणून, "मला तहान लागली आहे असे म्हटले!" (योहान १९:२८)

६) आंब घेतल्यानंतर, "पूर्ण झाले आहे" असे म्हटले!" (योहान १९:३०)

७) येशू उच्च स्वराने ओरडून म्हणाला, "हे बापा, 'मी आपला आत्मा तुझ्या हाती सोपून देतो; असे बोलून त्याने प्राण सोडला!" (लूक २३:४६)

## येशूने त्याचे जीवन टाकून दिले नाही

येशू या जगात एक निष्पाप कोकरा एक "बलीदान" असा आला "कारण बैलांचे व बकऱ्यांचे रक्त ह्याच्या योगे पापें दूर व्हावी हे अशक्य आहे. यास्तव तो जगात येतेवेळेस म्हणाला:-

"**यज्ञपशु व अन्नार्पण यांची तुला इच्छा नाही, तूं माझ्यासाठी शरीर तयार केले आहे; होमांनी व पापाबद्दलच्या अर्पणांनी तुला संतोष झाला नाही.**"

"**यावरुन मी म्हणालों, पाहा, हे देवा, ग्रंथपटात मजविषयी लिहून ठेविले आहे, तुझ्या इच्छेप्रमाणे करावयासाठी मी झालो आहे.**" (इब्री १०:४-७).

तेव्हा, येशूचा मृत्यु एक बलिदान म्हणून 'अगोदरच नियुक्त' केलेला होता! बायबल सांगते, **"देवानें जगावर एवढी प्रीति केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला; यासाठी की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवितों त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे"** (योहान ३:१६) येशूने स्वत: म्हटले :- **"जसा मोशानें अरण्यात सर्प उंच केला तसेच मनुष्याच्या पुत्राला उंच केले पाहिजे; यासाठी की जो कोणी विश्वास ठेवितो त्याला त्याच्या ठायी सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."** (योहान ३:१४-१५)

## येशूचे पुनरुत्थान!

येशू वध:स्तंभावर शुक्रवारच्या दुपारी मृत्यु पावला. परंतु तो तिसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी पहाटे मृतावस्थेतून पुन:जीवित झाला! मृत्यु त्याला धरुन ठेवू शकला नाही. त्याने त्याच्या स्वत:च्या शब्दात म्हटले,''

**"मी मेलो होतो तरी पाहा, युगानुयुग जीवंत आहे, आणि मरणाच्या व अधोलोकच्या किल्या मजजवळ आहेत."** (प्रकटी १:१८)

येशूच्या मृत्यु आणि पुनरुत्थानाच्या अगोदर मृतांमधील धार्मिक/नीतिमान मृतलोकात शांत पडलेले होते (यशया ५७:२) उलट अधार्मिकांचे आत्मे खालच्या भागात जेथे कधीहि न विझणारा अग्नि, आणि गंधक आहे अशा ठीकाणी होते. जे धार्मिक मेलेले तेथे त्यांना कांही क्लेश/यातना झाल्या नाहित, तेथे त्यांनी खालच्या भागातील त्या दुष्यांचा गोंगाट आणि किंचाळण्याच्या आवाज उघड केलेला पाहिला. येशूचा आत्मा अधोलोकात उतरला, तेथील धार्मिक मृतांना सुवार्ता सांगितली आणि त्यांना तिसऱ्या स्वर्गात - सुखलोकात आणण्यात आले. रकरिंथ १२:२-४, इफिस ४:८-९; स्तोत्र ६८:१-१८) येशूने (हाबेल ते बाप्तिस्मा करणाऱ्या योहाना पर्यंत) मृत्यु पावलेल्या धार्मिकांना त्यांनी केलेल्या कामाबद्दल मान्यता दिली. आदामावरील केलेल्या न्यायावर आपण बसलेलो नाही. देवाने निवडलेल्या पहिला मनुष्य आदाम, जो पातकात पडला त्याला कदाचीत सर्व-सामर्थी देवाकडून कृपा प्राप्त होईल.

## येशू दुसरा कैवारी पाठवितो

पुनरुत्थित झालेला येशू ख्रिस्त, जो स्वर्गात देवाच्या उजव्या बसलेला आहे; त्याने पवित्र आत्मा, जो कैवारी त्याला पाठविले हे (प्रे.कृ. २:१ या वचनात) पहावयास मिळते; आता येशू मृतावस्थेत नाहि; तर खरोखर जीवंत असून आम्हामध्ये राहात आहे! बायबल सांगते, प्रभु देव ज्याने स्वत:चा पुत्र दिला, तो आपल्याला सर्वकांहि कसे देणार नाही?

**"ज्याने आपल्या पुत्रास राखून न ठेविता आपणां सर्वांकरिता त्याला दिले, तो त्याजसहित आपल्याला सर्व कांही करो देणार नाही?"** (रोम ८:३२)

## पौलाचा अनुभव काय आहे?

पौल हा देवाच्या लोकांच्या विरुद्ध बंड करणारा होता. तो बेंजामिनाच्या वंशातला होता. त्याने कायद्याचा अभ्यास केला होता. तो परुषी होता. प्रचलीत कायद्यानुसार त्याला कोणीहि छळू शकत नव्हते. परंतु तो प्रमुख याजकाकाडून दिमिष्कांतल्या विश्वासणाऱ्यांना छळण्याकरिता पत्र घेऊन, त्याच्या मित्राना सोबत घेऊन जात असताना दिमिष्काच्या वाटेत त्याच्या भोवती अचानक आकाशांतून प्रकाश चमकला. त्याला दिसेनासे झाले. प्रभु येशू त्याजबरोबर बोलला, "शौला, शौला, माझा छळ कां करितोस?" तो म्हणाला, "प्रभो, तू कोण आहेस?" प्रभूने त्याला म्हटले ज्या येशूचा तूं छळ करितोस तोच मी आहे. पराणीवर लाथ मारणे तुला कठीण आहे" अतीशय चकीत होऊन थरथरकापत तो म्हणाला, "प्रभो, मी करावे अशी तुझी अपेक्षा आहे?" प्रभुने त्याला म्हटले, "उठ, व नगरात जा, म्हणजे तुला जे करावयाचे ते सांगण्यात येईल." (प्रे.कृ. ९:४-६) तेथे येशूचा एक शिष्य हनन्या त्याला भेटला व त्याजवर हात ठेवून त्याने प्रार्थना केली. तक्षणी त्याला दृष्टि आली. देवाने या बंडखोराची-विरोधकाची राजांना आणि विदेशीयांना सुवार्ता सांगण्यासाठी निवड केली. त्यानंतर तो येशू ख्रिस्ताचा उत्कृष्ठ असा शिष्य बनला, इतका की सुवार्ता गाजविण्यासाठी प्राण देण्याची देखील त्याची तयारी झाली. देव त्याच्या सेवेकरिता सर्वांनाच बोलावितो. त्याने त्याच्या श्वासाच्या शेवटच्या क्षणापर्यंत देवाची सेवा केली.

## एक व्यक्ति काय करु शकते?

पौल त्याच्या स्वत:चा अनुभव कथन करतो. **"मी ख्रिस्ताबरोबर वध:स्तंभाला खिळीलेला आहे. आणि मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो..."** (गलती २:२०) सोप्या भाषेत ख्रिस्ताबरोबर त्याचा मृत्यु झाला आणि आता त्याजमध्ये जी व्यक्ति रहात आहे, ती ख्रिस्त आहे!

देवाची अशी इच्छा आहे, की सर्वांनी

....Contd. to page 6


**नहेम्याह बाइबल कॉलेज**
**रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।**

माध्यमः हिन्दी

ECHO OF HIS CALL (ECHO GROUP)

ATA Regd. Candidate for Membership NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल

योग्यता 10 वी या अधिक जल्दी करें!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

**प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ एप्रिल २०२२ ते १८ मे २०२२ पर्यंत**

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ एप्रिल** : १७ तारखेची आमची पुनरुत्थान दिनाची उपासना देवाने आशीर्वादीत केली.

**२० एप्रिल** : शुभवर्तमान न पोंहचलेल्या विभागात ते नेण्याकरिता देवाने त्याच्या कृपेद्वारे आम्हास सहाय्य केले.

**२१ एप्रिल** : देवाने मागील महिन्यातील आमचे सेवेचे सर्व कार्यक्रम आशीर्वादीत केले.

**२२ एप्रिल** : आमच्या सर्व सहसंपादकांकरिता आणि त्यांच्या कुटुंबीयांकरिता देवाची स्तुती करुया.

**२३ एप्रिल** : आमच्या मंडळीतील पुरुषांची सभा देवाने आशीर्वादीत केली.

**२४ एप्रिल** : आमच्या मुद्रणालयात १६ भाषांमध्ये छापून मिशनक्षेत्रात पाठविण्यात येत असलेले प्रकाशन साहित्य देव आशीर्वादीत करित आहे.

**२५ एप्रिल** : आमच्या मुख्य मंडळीत देव विश्वासणाऱ्यांची अधीक भर घालीत आहे.

**२६ एप्रिल** : आम्हाला प्रार्थनेद्वारे आणि दानाद्वारे आधार देवाच्या सर्वांकरिता देवाची स्तुती करुया.

**२७ एप्रिल** : सर्व राज्य समन्वयक आणि त्यांचे कुटुंबियांकरिता स्तुती करुया.

**२८ एप्रिल** : देवाने आमच्या मुख्य मंडळीतील स्त्रियांची सभा आशीर्वादीत केली.

**२९ एप्रिल** : आमच्या ऑन लाईन हिन्दी थियॉलॉजीकल अभ्यास क्रमावरील देवाच्या आशीर्वादाबद्दल त्याची स्तुती करुया.

**३० एप्रिल** : आमच्या सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नेहम्या बायबल कॉलेज, आणि टपालाद्वारे करण्यात येत असलेल्या अभ्यास क्रमांबद्दल देवाची स्तुती करुया.

**०१ मे** : मिशन क्षेत्रात सेव करीत असलेल्या सेवकांच्या समर्पित सेवेबद्दल देवाची स्तुती करुया.

**०२ मे** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज व त्यांच्या कुटुंबियांवरील देवाच्या विपुल आशीर्वादाबद्दल त्याची स्तुती करुया.

**०३ मे** : देवाने करोना महामरी पासून - **एको ऑफ हिज कॉल** सेवेतील सर्व स्टाफला सुरक्षित ठेविल्याबद्दल त्याची स्तुती करुया.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ मे** : युक्रेन आणि रशिया यांच्या मधील युद्ध थांबावे आणि जगात सर्वत्र शांती असावी याकरिता प्रार्थना करा.

**०५ मे** : या महिन्यातील **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यासाठी देवाने निधी उपलब्ध करावा यासाठी प्रार्थना करा.

**०६ मे** : सर्व ख्रिस्ती संस्थांकरिता प्रार्थना करुया.

**०७ मे** : देवाने आमच्या सर्व समन्वयकांना आणि पाळकांना नव्याने शक्ति पुरवावी.

**०८ मे** : आमच्या **एको ऑफ हिज कॉल सेवा कार्याकरिता** देवाने आणखीन समर्पित कामकरी आणावेत.

**०९ मे** : स्त्रीया आणि मुलींवर होत असलेले अत्याचार पूर्णपणे बंद व्हावेत.

**१० मे** : जगातील प्रत्येक देशांमधून करोना महामरीचे पूर्ण उच्चाटन व्हावे यासाठी प्रार्थना करुया.

**११ मे** : मिशन क्षेत्रातील सेवकांकरिता प्रार्थना करुया.

**१२ मे** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, आणि महान आज्ञापालनातील भागीदार व त्यांच्या कुटुंबियांकरिता प्रार्थना करुया.

**१३ मे** : करोना महामरीमुळे ज्यांना त्यांचे प्रियजन गमवावे लागले अशा सर्व दु:खी कुटुंबाकरिता प्रार्थना करुया.

**१४ मे** : इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु एम्. पॉल राज यांना पूर्ण आरोग्य प्राप्त व्हावे याकरिता प्रार्थना करणे सुरु ठेवा.

**१५ मे** : आमच्या वरिष्ठ पालकांना त्यांचे आत्मचरित्र यशस्वी रित्या लिहून पूर्ण करता यावे यासाठी प्रार्थना करा.

**१६ मे** : जागतीक शांततेकरिता प्रार्थना करा.

**१७ मे** : आमच्या मुख्य मंडळीतील आणि शाखा मंडळ्यांतील सर्व विश्वासणारे, पुढारी (नेतृत्व करणारे), प्रार्थना योद्धे यांच्यासाठी प्रार्थना करा.

**१८ मे** : देवाने ामच्या वरिष्ठ पाळकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिपासून सुरक्षित ठेवाणे सुरु ठेवावे.

(पान ४ वरुन)

ख्रिस्ताच्या कळपात यावे, तारणाची सर्वोच्च भेट स्विकारावी आणि त्याजकरिता जगून देवराज्यात प्रवेश करावा. पौल सर्वांना आग्रहाने विनविती :- "**यास्तव बंधुप्रमाणे, मी देवाच्या करुणांमुळे तुम्हांस विनविती की, तुम्ही आपल्या शरीरांचा जीवंत, पवित्र व देवाला प्रिय असा यज्ञ करावा, ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे.**" (रोम १२:१)

तो असेहि म्हणतो, "**या युगाबरोबर समरुप होऊ नका;तर आपल्या मनाच्या नवीकरणानें स्वत:चें रुपांतर होऊ द्या, यासाठी की देवाची जी उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा, ती काय आहे हे समजून घ्यावें.**" (रोम १२:२) प्रभु त्याजबरोबर जीवन जगण्याकरिता आपणा सर्वांकडून समर्पित जीवनाची अपेक्षा करित आहे, आणि येण्याच्या त्याच्या (दुसऱ्या) समयी आपण जेव्हा देवाच्या तुतारीचा आज्ञाध्वनि ऐकून, त्यावेळेस रुपांतर अनुभवून, स्वर्गाकडे वर जाऊन येशूला ढगात अंतराळी त्याच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याने जीवीत हाऊन भेटू आणि स्वर्गाच्या दारांतून आत प्रवेश करुन देव पित्याला - सर्वसामर्थी देवाला, जो त्याच्या राजासनावर बसलेला आहे त्याला भेटू. (स्तोत्र ११:४)

## जग कोठे जात आहे?

जगीक लोक हे सैताना द्वारे त्याच्या फसव्या-खोट्या पद्धतींच्या द्वारे भुलविले जातात आणि तो त्यांना गोंधळलेल्या अत्यानंदाकडे आणि जगाच्या फसव्या सुखाकडे आकर्षित करुन त्यांची शांति चोरुन जगात ढकलून देतो. जग त्याच्या या बाह्य देखाव्यामुळे उत्कर्ष पावते. त्यांना त्यांच्या गळ्याभोवती मृत्युचा विळखा पडलेला आहे याची जाणीव नसते. ते आता क्वचितच देवाच्या वचने ऐकण्यास कान देतात. वध:स्तंभा विषयीच शिक्षण त्यांच्या करिता शाप असे आहे. ते स्वत:बद्दलच्या पुष्कळ गोष्टिंची आणि जगाविषयीची फुशारकी मारतात. ते त्यांच्या राजवाड्यासारखा घराविषयी; नांवे प्रमाण असलेल्या मोटारी विषयी, त्यांच्या श्रीमंती विषयी, बँकेतील शिल्लक, पत्नी-लेकरें आणि अशा इतर अनेक गोष्टिंबद्दल फुशारकी मारतात परंतु ख्रिस्ता विषयीच्या नाहि. अशा अनेकांनाच कोवीड-१९ने नामनिर्देश संपुष्टात आणिला. लोक प्राणवायुच्या शोधार्थ धावपळ करीत होते! आणि अनेकांचा तो न मिळाल्यामुळे मृत्यु झाला. ढग फुटीमुळे जगात अनेक भागात जीवन विस्कळीत झाले. हल्लीचा दिवसात युरोपीयन देशात, चीन मध्ये पर्जन्यवृष्टिने १००० वर्षांच्या मानवी नोंदीचा उच्चांक मोडला. कडे कोसळणे, ज्याला मुखीचे उद्धवणे, भुमिकंप इत्यादी घडामोडीने मानवी जीवन जगणे कठीण केले. तरी देखील ते नम्रता स्विकारुन फुशारकी मारणे थांबवित नाहीत. पवित्र आत्मा म्हणाले -

"**परमेश्वर म्हणतो, ज्ञान्यानें आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये; बलवानानें आपल्या बलाचा व श्रीमंतानें आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये; बाळगावयाचा असला, तर मी दया करणारा व पृथ्वीवर धर्म न्याय चालविणारा परमेश्वर आहे, याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, याच्याविषयी बाळगावा; यांत मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो.**" (यिर्मया ९:२३-२४)

पृथ्वीवर प्रभुने स्वत: दयाळूपण, न्याय आणि धार्मिकता कृतित उतरविली. प्रभु सर्वश्रेष्ठ आहे; पृथ्वीवर किंवा स्वर्गात ज्या प्रभु येशू ख्रिस्ताने स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केली. त्याच्याहून अधिक श्रेष्ठ असा कोणीहि नाहि. त्यामुळेच पौल म्हणतो :-

"**आपला प्रभु येशू ख्रिस्त याच्या वध:स्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाहि अभिमान बाळगणें माझ्या हातून न होवो; त्याच्या द्वारे जग मला व मी जगाला वध:स्तंभावर खिळलेला आहे.**" (गलती ६:१४)

पौला साठी, जग विस्तीर्ण असे उघडलेले नाहि; तर ते वध:स्तंभावर खिळलेले किंवा मर्यादीत असे आहे आणि तो जगाला खिळलेला किंवा मर्यादीत असे आहे आणि तो जगाला खिळलेला असा आहे. देवाच्या एका व्यक्तिने तामिळ भाषेत अशा प्रकारचे गीत रचीले; "मेनमयी पारथुवेला."

**त्याचे नाव मी उंचावीन**
**त्याचे नाव मी उंचावीन**
**मी केवळ येशूचे प्रेम उंचावीन!**
**क्रुस माझ्या कर्ण्यात, क्रुस आहे माझे**


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तामिळ

ATA — Regd. Candidate for Membership — NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI — ECHO OF HIS CALL ★ Estd.: 1969

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा!**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

**शरण स्थान,**

**स्तुति तुला येशू, स्तुति तुला**
**कॅलवरीच्या येशूची स्तुति!**
**मी होतो खिळीलेला, मी होतो खिळीलेला**
**मी नाहि, परंतु येशू**
**दर्शविन मी मजमध्ये।**
**मी उचलील क्रुस, मी उचलील क्रुस,**
**करीन दु:ख सहन मी**
**येशूच्या गौरवाकरिता!**

हे सर्व ख्रिस्ती जनांचे गीत असले पाहिजे!

आपला देव हा त्रेक देव आहे. तो ख्रिस्त म्हणून, प्रभुचा दूत म्हणून, म्हणजे आशीर्वादाचा आणि संरक्षणाचा प्रभू म्हणून प्रकट होतो; तो देव म्हणून प्रकट होतो; कृति करणारा प्रभु देव, सर्वात शेवटी सर्व कांही देणारा जो तो असा प्रकट होतो. त्याचे दुसरेहि प्रकटीकरण आहे, ते म्हणजे अनंतकालीचा देव, म्हणजे उत्पत्तिच्या अगोदर उत्पत्तिच्या दरम्यान आणि उत्पत्तिच्या नंतर अस्तीत्वात असलेला यामुळेच आपला देव हा भयावह देव आहे!

पौल त्याला ख्रिस्त प्राप्तिकरता लागलेल्या उत्कंठतेमुळे म्हणतो, ''ज्या गोष्टि मला लाभाच्या होत्या त्या मी ख्रिस्तामुळें हानीच्या अशा समजलो आहे, त्या म्हणजे त्याचा वंश, श्रीमंती, कायद्याचे ज्ञान, रोमी नागरिकत्व इत्यादी सर्व ख्रिस्तासाठी केरकचरा अशा लेखतो. यासाठी कि ख्रिस्त हा लाभ प्राप्त व्हावा. शिवाय त्याला ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे सामर्थ्य, त्याच्या दु:खाचे भागीपण ही त्याच्या मरणाला अनुरुप होऊन समजुन घेण्याची इच्छा होती. (फिलीपै ३:७,१०-११)

फादर बेरचमॅन गातात -

हे माझ्या राजा तुझी समक्षता आहे पुरेशी,
नेहमीच पुरेशी मजसाठी,
तुझी समक्षता, तुझी समक्षता
तुझी दैवी समक्षता!
तुझी अधीक ओळख होईपर्यंत,
तुझ्या अधीक जवळ येईपर्यंत!

## येशू बोलावितो!

**''अहो कष्टी न भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व मजकडे या; म्हणजे मी तुम्हांस विश्रांति देई''** (मत्तय ११:२८)

हे बोलावणे, केवळ त्याच्या स्वत:च्या, यहूदी लोकांकरिताच नाही, तर संपूर्ण जगातील लोकांकरिता आहे, मग ते कोणत्याहि राष्ट्राचे, वंशाचे किंवा भाषेचे का असेना, येशूने म्हटले ''**जितक्यांवर मी प्रीति करितो तितक्यांला त्यांचे अपराध त्याच्या पदरी घालून शिक्षा करितो, यास्तव आस्था धर आणि पश्चाताप कर. पाहा, मी दाराजवळ उभा आहे व ठोकीत आहे; जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आंत जाईन व त्याजबरोबर जेवीन आणि तो मजबरोबर जेवील.**'' (प्रकटी ३:१९-२०)

**पवित्र शास्त्र म्हणजे, ''तोच आपल्या पापांबद्दल प्रायश्चित आहे; आणि आपल्याच पापांबद्दल केवळ नव्हे तर सर्व जगाच्याहि पापांबद्दल आहे.**'' (१ योहान २:२)

येशूने जगाच्या तारणाकरिता - उद्धाराकरिता वध:स्तंभ स्विकारला. देवाला त्याचे राज्य फार मोठ्या अनुणगिक लोकांनी म्हणजे आदामापासून ते येशू ख्रिस्तापर्यंत भरुन टाकावे असे हवे होते! त्याच्याकडे दुसऱ्या खंडासाठी राजांचा-राजा म्हणून (हजार वर्षे) या जगात राज्य करण्यासाठी योजना होती! म्हणजे त्यानंतर तो परत एकवार मरणार नव्हता कारण त्यामधील रहिवासी हे देवाने १२ वंशातून निवडलेल्या यहूदी लोकांच्या कपाळावर देवदुतांच्या द्वारे महान संकटाच्या काळात शिक्का मारीलेले लोक असतील.

आता वध:स्तंभामधून कृपा आणि दया वहात आहे! प्राचीन/पुरातन काळात लोकांना कृपा परम पवित्र स्थानात मोठ्या पडद्याच्या मागे ठेवण्यात आलेल्या कोशांतून प्राप्त होत होती. परंतु आता ते स्थान येशूचा वध:स्तंभ आहे! जे लोक वध:स्तंभाकडे पाहातात, स्वत:करिता मरतात आणि ख्रिस्तासाठी जगतात आणि जे जगतात, ते ख्रिस्तासाठी जगतात आणि देवाचे राज्य प्राप्त करुन घेतात.

## शिष्यांना बोलावणे

शिष्यांना बोलावणे हे विश्वासणाऱ्यांना असलेल्या बोलावण्याच्या पेक्षा वेगळे आहे. शिष्यांच्या बोलाविण्यात/पाचरणात मोठ्या प्रमाणात दु:ख सहन आणि त्याग गुंतलेला असतो. सर्वांनाच स्वत:चा, कुटुंबाचा आणि घराचा त्याग करणे सोपे नाही. परंतु, जे कोणी अशा जगीक गोष्टि नाकारुन ख्रिस्ताला अनुसरतात ती एक फार मोठी बाब आहे. त्यांना फार मोठ्या प्रमाणात सन्मान प्राप्त होईल! त्यांचे शिष्य असे पाचारण/बोलावणे स्विकारतात आणि प्रेषित बनतात! हल्ली अनेक जण स्वत:ला प्रेषित म्हणवून घेतात! आणि ते देखील त्यागाची, मंडळी रोपणाची स्वत:च्या नावावर कोणतीहि नोंद नसताना.

येशूने म्हटले, ''**कोणी माझा अनुयायी होऊ पाहत असल्यास त्याने आत्मनिग्रह करावा व आपला वध:स्तंभ उचलून घेऊन मला अनुसरावे.**'' (मार्क ८:३४) पेत्राने येशूला म्हटले, ''पाहा आम्ही सर्व सोडून आपले ''अनुयायी झालो आहो. येशूने उत्तर दिले, मी तुम्हांस खचीत सांगतो, ज्यानें मजकरिता व सुवार्तेकरिता घर, भाऊ, बहिणी, आई, बाप, मुले किंवा शेते सोडिली आहेत अशा कोणाहि इसमाला, या सांप्रतकाळी शंभरपट घरे, भाऊ, बहिणी, आया, मुले, व शेते ह्यांबरोबर पाठलाग आणि येणाऱ्या युगात सार्वकालिक जीवन मिळाल्या वाचून राहणार नाही'' (मार्क १०:२८-३०). जे देवासाठी देतात ते गरिब राहणार नाहीत! आणि येशूने पेत्राला पुन: म्हटले, ''मी तुम्हांस खचीत सांगतो, पुनरुत्पतीत मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवाच्या राजासनावर बसेल तेव्हा माझ्या मागे चालत आलेले तुम्हीहि बारा राजासनावर बसून इस्त्राएलाच्या बारा वंशांचा न्यायनिवाडा कराल.'' (मत्तय १९:२७-२८)

क्रुस त्याला अनुसरणाऱ्याला इतके अधीक आशीर्वाद आणतो. परंतु अनेकांना क्रुसाचे शिक्षण हे मुर्खपण वाटते. ते सैतानाच्य पकडीत सापडलेले आहेत आणि नाशाकडे वाटचाल करीत आहेत. कसेही असो, ज्या प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तिने ख्रिस्ताचे प्रेम चाखले आहे - अनुभवले आहे आणि क्रुसाचे महात्म जतन करतो, अशांनी त्या वाटचालत असलेल्यांना बोलावून त्यांना ख्रिस्ताच्या प्रीति खाली आणावे, अशासाठी त्यांना देखील स्वत:ला वाचविता येईल. हल्ली हजारो लोक ख्रिस्ताच्या प्रीति खाली आणि क्रुसाच्या महानतेकडे येत आहेत! आपल्या करिता क्रुसाचे शिक्षण देवाचे सामर्थ्य असे आहे! आमेन!!

- * - * - * - * - * -



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

### देवाद्वारे चांगली परिस्थिती पुरविली गेली

कन्नातुवीलयी या माझ्या छोट्या गावांमधील शासनाच्या प्राथमिक शाळेत माझे शिक्षण पूर्ण झाल्या नंतर माझ्या पालकांनी माझी आध्यात्मिक रितीने वाढ होत रहावी यासाठी मला नेय्युर



कान्नातुवीलयी सरकारी शाळा



हॅकर मेमोरियल प्रायमरी स्कूल



एरानियल सरकारी शाळा



लक्ष्मीपुरम कॉलेज

येथील 'हॅकर मेमोरियल अप्पर प्रायमरी स्कूल' या माध्यमिक शाळेत प्रवेश घेतला. या शाळेत ६ व्या इयत्तेपासून प्रथमच मला इंग्रजी शिकविण्यात सुरवात झाली. हि शाळा माझ्या घरापासून ५ कि.मीटर अंतरावर होती. माझ्या पालकांनी मला दररोज दहा कि.मी. चालण्यास शिकविले. मी शाळेतील शिक्षकांच्या प्रेम, शहाणपण, समर्पितपण, आणि त्यागी वृत्ती यामुळे त्यांच्याकडे आकर्शित झालो. त्यानंतर माझे हायस्कूल शिक्षण शासनाच्या एरानिएल शाळेत आणि लक्ष्मीपुरम आर्ट आणि सायन्स कॉलेज-नैय्युर येथुन पूर्ण झाले.

रेव्ह. केसारी, मिस्टर मुथाईहा (हेडमास्तर), मिस्टर सी. देवदास, मिस्टर सुंदरराज आणि स्त्री शिक्षिका - मिसेस ज. सरोजा थंगावादिवू,



मिस्टर सी. देवदासन यांच्या सेवा निवृत्तीच्या वेळचा फोटो (बसलेल्या व्यक्तिंत डावीकडून-उजवीकडे चौथी व्यक्ति)

मिसेस येथाझ, मिसेस पी. लीसी आणि इतर ज्यांच्या समर्पित पणाने मला देवाचे भय असणाऱ्या व्यक्ति घडविले.

मला एक शारिरीक आजार असल्यामुळे इतर विद्यार्थीबरोबर मिसळण्यात मला न्युनगंड वाटत असे आणि मी ते टाळीत होतो. माझे शिक्षक मिस्टर सी. देवदास, मिस्टर सुंदरराज, मिसेस बी. अन्नाबाई मोझेस, मिसेस स्टेला हेपसिबा चेल्लापा) आणि मिसेस. जे. सरोजा थंगावदिवू यांचा मला त्या मनोवृत्तीतून बाहेर काढण्यात आणि चालना देण्यात फार मोठा सहभाग होता.

या शिक्षकांच्या द्वारे जी ईश्वरी प्रीति आणि काळजी मला दर्शविण्यात अली मी जीवंत देवाकडे ख्रिस्तीकडे मला आणण्यास कारणीभूत ठरली. त्यानी मला मी शारिरीक, मानसीक अशा दुर्बल-पददलीतांवर कशी प्रीति करावयाची हे देखील शिकविले. त्या



मिसेस. स्टेला हेपसीबा, मिसेस बी. अन्नाबाई मोझेस आणि मिसेस. जे. सरोजा थंगावादिवू (डावीकडून-उजवीकडे)

शाळेत मला बायबल मधील अतिखोल रहस्ये देखील शिकण्यास मिळाली. बायबलमधील स्तोत्र १, २, २३, ९९, १२१, १३६, १ करिंथ १३ अध्याय, मत्तय ४ ते ६ अध्याय माझ्या तरुण वयात मला मुखोगत करता आली. परिश्रम, प्रामाणिकपणा आणि स्पष्टोक्तिपणा यांचे महत्व देखील मला शिकण्यास मिळाले. ह्याच अनुभवांनी मला, मी मोठा झाल्या नंतर '**सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल**' सुरु करण्याची प्रेरणा मिळाली. माझा जवळच वर्गबंधु बंधु बी. इम्यॅनुल



भाई बी. एम्मानुअेल मनोहरन



भाई जी. जयानंदा पौलोमनी

मनोहरन, रेव्ह. सॅम येसूदास, बंधु चार्लस पर्न बेंटले, बंधु हमफ्रे बींस्टर, बंधु थंगारासल, बंधु हॅरिसन पेस्टस जोएल, बंधु रवी देवधानम, बंधु डी.डी. राजन, बंधु ओडसन मोहन, रेहव्ह. डॉ. अे. सेल्वराज, आणि बंधु जी. जयानंदा पॉलमणि, हे सर्व माझे आध्यात्मिक मित्र होते. ते आता प्रभु येशू ख्रिस्ताच्या सेवेत आघाडीवर आहेत. परंतु त्यामधील दोघे, बंधु हॅरिसन फेस्टस् जोएल, आणि बंधु जी. जयानंदा पॉलमणि देवा बरोबर आहेत.

अशा रितीने देवाने पायरी-पायरीने भक्कम पाया तयार केला, अशा साठी की मी एक देवाचा सेवक तयार व्हावा, जो त्याच्या सेवेवर आणि आत्मिक गहनतेवर प्रेम करील.

# बातमी नहेम्या बायबल कॉलेजकडून

मागील काही वर्षांमध्ये कोवीड-१९ मुळे आमच्या सेवांवर आर्थिक दृष्ट्या फार मोठा परिणाम झाला. देवाच्या कृपेने, या कठीण परिस्थितीवर मात करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. गौरव देवाला असो.

आम्ही विश्वासाने प्रार्थना करुन आणि काटकसन करुन भागविण्याचा प्रयत्न करीत आहोत. सध्या ग्रंथालयातील पुस्तकांची विद्यार्थ्यांना सहजपणे शोधून वापरता येण्यासाठी संगणकांमध्ये नोंद करण्यासाठी पुढील तातडीच्या गरजा आहेत.





आमचे बायबल कॉलेज ज्या 'एशियन थियॉलॉजीकल असोसिअेशन (ATA) चे नोंदणीकृत सभासद आहोत, त्यांच्या प्रमाणित अपेक्षेनुसार विद्यार्थ्यांना दररोज उपयोग करता येईल अशा ८००० पुस्तकांचे ग्रंथालय असणे आवश्यक आहे. आमच्या ग्रंथालयात २००० पुस्तके होती. उर्ववरित पुस्तके खरेदी करण्याकरिता आणि ती योग्य प्रकारे ठेवण्याकरिता आमच्याकडे मार्ग नव्हता. या गरजेकरिता आम्ही पुष्कळ दिवसांपासून प्रार्थना करीत होतो.

आमच्या प्रार्थनांच्या उत्तरात, आमच्या एका मित्राने ४००० पुस्तके देणगी दाखल दिली. हि सर्व पुस्तके व्यवस्थित रचून ठेवण्यासाठी, खुप प्रयत्नाअंति देवकृपेमुळे आम्ही १८ स्टीलचे रॅकस् खरेदी करु शकलो.

आता, त्या पुस्तकांची नांवे आणि इतर तपशीलवार माहिती संगणकामध्ये नोंद करावयाची आहे, जे अतिशय खर्चिक आणि अवघड असे काम आहे. आताच आमच्या कॉलेजच्या शिक्षकांना मानधन, पालकवर्ग, कर्मचारी, मृद्रणालया संबंधीत खर्च, प्रवास खर्च हे सर्व प्रत्येक महिन्याचा खर्च सांभळणे जड जात आहे. अशा गरजांबद्दल आम्ही जाहिरपणे वाच्यता करित नाहि. परंतु प्रत्येक महिन्यांचा खर्च

| | |
|---|---|
| १. प्रत्येकी रुपये ५५,०००.००/- ची दोन संगणके | ₹ १,१०,०००.००/- |
| २. संगणकाकरिता सॉफ्टवेअर | ₹ २०,०००.००/- |
| ३. संगणकात पुस्तकांची नोंद करण्याकरिता | ₹ ३०,०००.००/- |
| ४. इतर खर्च | ₹ १०,०००.००/- |
| एकूण | ₹ १,७०,०००.००/- |

या निकडीच्या गरजा पूर्ण करण्याकरिता आम्हाला अडचणी भासत आहेत. या गरजांकरिता कृपया आग्रहाने प्रार्थना करा. देव जर तुमच्या अंत:करणाला स्पर्शकरित असेल तर थोडीशी रक्कम, किंवा वरील पैकी एक वस्तू किंवा पूर्ण रक्कम देणगीच्या रुपात देवू शकता. आमच्या मित्राना देण्याकरिता भाग पाडण्याची आम्हाला सवय नाही. तुम्ही आमचे सहकारी आहात यामुळे आम्ही तुमच्या समोर ही गरज ठेवत आहोत. कृपया गैरसमजुत करुन घेऊ नका. गरजेकरिता प्रार्थना करीत राहा. ही विनंती.

आम्ही देखील तुम्हांकरिता प्रार्थना करीत आहोत. प्रभु येशू ख्रिस्त तुम्हाला अधिकांअधीक आशीर्वाद देवो!

**- संपादक**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल युट्युब

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपाकरुन आमच्या एको ऑफ हिज कॉल युट्युब चॅनल बघा आणि सबस्क्राईब करा. आभार

\- संपादक

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |
| SWIFT CODE | : | **SBI NIN BB 455** |

### *2. Bank : ICICI Bank*

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-   आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th APRIL 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**